# वीजबिलांची वसुली आता करा महावितरणच्या वॉलेटद्वारे व मिळवा आकर्षक कमिशन

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित




## महावितरणने आणली रोजगाराची आकर्षक संधी !

महाराष्ट्रातील २.६० कोटी ग्राहकांना वीज वितरण सेवा देण्याचे काम महावितरण कंपनी अव्याहतपणे करत आहे. ग्रामीण भागातील सुमारे ६०% व शहरी भागातील ४०% कोटी ग्राहकांना महावितरण कंपनी वीजपुरवठा करत आहे. महावितरणच्या सुजाण ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्याचे व्रत पुढे चालवत ग्राहकांच्या दिशेने अजून एक पाऊल पुढे टाकत वीज देयक भरणा व वसुली अधिक सोयीचे होण्यासाठी महावितरण सुरु करत आहे. **‘महावितरण वॉलेट’**

महावितरण वॉलेट या पध्दतीद्वारे कोणीही छोटे उद्योजक जसे की, किराणा दुकान, जनरल स्टोअर्स, मेडिकल दुकान व वीज बील स्वीकारणाऱ्या एजन्सी इ. आपल्या परिसरातील वीजदेयकांची वसुली करुन कमिशनद्वारे उत्पन्न मिळवू शकतात.




### महावितरण डिजीटल वॉलेटची वैशिष्ट्ये

- अतिशय सोपी ऑनलाईन नोंदणी पध्दती व तेही अगदी कमी कागदपत्रांद्वारे.
- मोबाईल किंवा संगणकाद्वारे वापरता येण्याजोगी सोपी व अनुरुप प्रणाली
- आकर्षक कमिशन
- वॉलेट रिचार्ज करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीची भरणा सुविधा
- ऑनलाईन पध्दतीमुळे कुठल्याही महावितरणच्या कार्यालयाला भेट देण्याची गरज नाही.






## वॉलेट धारक कोण होऊ शकतो ?

१) कोणतीही व्यक्ती (individual)
(१८ वर्षावरील individual)

२) मेडिकल दुकानदार, जनरल स्टोअर्स, बचत गट.

३) महावितरणची वीज बील वाटप एजन्सी व मिटर वाचन करणाऱ्या संस्था.



## नोंदणी पध्दती

**1** इच्छूक व्यक्तींनी महावितरणच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा आहे.

**2** अर्जदारांच्या अर्जांची व जागेची पडताळणी महावितरण उपविभागीय कार्यालयाद्वारे केली जाईल.

**3** नोंदणीसाठी व जागेच्या पडताळणीसाठी कोणतेही शुल्क लागू नाही.



**4** आवश्यक कागदपत्रांची यादी.

१. आधारकार्ड
२. पॅन कार्ड
३. जीएसटी नंबर/प्रमाणपत्र (लागू असल्यास)
४. गुमास्ता प्रमाणपत्र (Shop & Establishment Certificate) (वैयक्तिक व्यतिरिक्त इतरांसाठी लागू)
५. ॲड्रेस प्रुफ (पत्त्याचा पुरावा) (आधारकार्ड वरील पत्ता कामाच्या जागेपेक्षा वेगळा असल्यास)
६. फोटो (छायाचित्र)
७. कॅन्सल चेक




**5** वॉलेट विनंती महावितरणच्या मुख्य कार्यालयाद्वारे मंजूर केली जाईल. सर्व प्रकारचे पत्रव्यवहार हे नोंदणीकृत ई-मेल व भ्रमणध्वनी क्रमांकावर केले जातील.




# वॉलेट रिचार्ज पध्दती

१) वॉलेटधारकाने प्रथम वॉलेट रिचार्ज कमीतकमी रु. ५०००/- चे करणे गरजेचे आहे. त्यानंतर रु. १०००/- च्या पटीत रिचार्ज करता येईल.

२) वॉलेटधारक डेबीट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेटबँकींगद्वारे ऑनलाईन पध्दतीने वॉलेट रिचार्ज करु शकतात.




# वीजदेयक स्वीकृती पध्दती

१) वॉलेट रिचार्ज केल्यावर वॉलेट धारक वॉलेट ॲप मध्ये नोंदणी घेऊन महावितरणच्या ग्राहकांकडून वीजदेयकांची वसुली करु शकतात.

२) वीजदेयक वसुली केवळ रोख रक्कमेद्वारेच करता येईल.

३) वीजदेयक स्वीकृती केल्यावर महावितरणद्वारे ग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाईलवर SMS दिला जाईल. (वॉलेटधारक महावितरणच्या ग्राहकाला वॉलेट ॲपद्वारे भरणा पावती देऊ शकतो. भरणापावती देण्यासाठी प्रिंटर विषयक तांत्रिक बाबींची सविस्तर माहिती महावितरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे)

४) **सब वॉलेट पध्दती**
एका वॉलेट धारकास आपल्या वॉलेटला विविध व्यक्तींना लॉगीन देण्याची सुविधा उपलब्ध आहे. या पध्दतीत एकापेक्षा जास्त व्यक्ती जे ग्राहकांच्या घरोघरी जाऊन विविध लॉग इन द्वारे एकाच वॉलेटचा बॅलन्स वापरून वीजदेयक वसुलीचे काम करू शकतात. अशा प्रकारच्या वसुलीचा लेखा जोखा व कमिशन मुख्य वॉलेट मध्ये वर्ग केला जाईल.



## कमिशन

१) महावितरण डिजीटल वॉलेटद्वारे वीजदेयक वसुली केल्यास, वॉलेटधारकास प्रति पावती रु. ५/- (कर सोडून) कमिशन दिले जाईल.

२) वॉलेट धारकाने ऑनलाईन पध्दतीने कमिशन देयक ॲपमध्ये सादर करावयाचे आहे. ही प्रक्रिया पूर्ण केल्यावर, वॉलेटधारकास महिना अखेरीस कमिशनची रक्कम वॉलेटमध्ये वर्ग करण्यात येईल. कमिशन बिलाची स्थळप्रत प्रत्यक्ष सादर करण्याची आवश्यकता नाही.




## वॉलेट अंतरिम परतावा व वॉलेट बंद

१) वॉलेटधारक ऑनलाईन विनंतीद्वारे अंतरिम परतावा घेऊ शकतात.

२) वॉलेटधारक वॉलेट बंद करण्याचा ऑनलाईन विनंती अर्ज वॉलेट ॲपद्वारे करु शकतो. त्यानुसार महावितरणच्या मुख्य कार्यालयाद्वारे वॉलेट बंद करण्याची प्रक्रिया केली जाईल.

वॉलेट - संकेत स्थळ **https://occs.mahadiscom.in/occsWallet/index**
तसेच वॉलेट ॲप प्ले स्टोअरवरुन देखील डाऊनलोड करता येऊ शकते.

अधिक माहितीसाठी/ शंकानिरसन करण्यासाठी/ तक्रारींसाठी खालील ई-मेल ID :-
**helpdesk_wallet@mahadiscom.in** वर संपर्क साधावा.

---

सदर वॉलेट पुस्तिका महावितरणच्या **(www.mahadiscom.in)** या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.


**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

प्रकाशगड, प्लॉट क्र. जी-९, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : ०२२-२६४७४२११/२६४७२१३१
संकेतस्थळ : www.mahadiscom.in